22-23

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५
Estd : 1962
NAAC "A++" Grade
Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/एसआरएस/ दि. 20 JUN 2022
No 0 0 7 1 8

प्रति,

मा. प्राचार्य,

भारती विद्यापीठाचे,

न्यू लॉ कॉलेज, सांगली.

विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.

संदर्भ : आपले जा.क्र. १. भावि/न्यूलॉकॉसां/९०/२२-२२, दि.२०.०८.२०२१
२. भावि/न्यूलॉकॉसां/Affi-Cyber/११५/२०२१-२२, दि.२९.११.२०२१
३. भावि/न्यूलॉकॉसां/Affi-Taxation/११६/२०२१-२२, दि.२९.११.२०२१ रोजीचे प्रस्ताव.

महो./महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०२२ पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. छाननी समितीने नमुद केलेल्या अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाकडून सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता | ६५% पेक्षा कमी गुणांकन प्राप्त झालेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण | १. तीन वर्षीय विधी अभ्यासक्रम (६०)<br>२. पाच वर्षीय विधी अभ्यासक्रम (६०)<br>३. पी.जी. डिप्लोमा इन टॅक्सेशन (६०)<br>४. पी.जी. डिप्लोमा इन सायबर लॉ (६०) | जून २०२२ पासून एक (०१) वर्षासाठी | निरंक |

छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. यापुर्वीच्या संलग्नीकरण मान्यतेच्या पत्रामधील काही अटींची पुर्तता झाली नसल्यास सदर अटींची पुर्तता करण्यात यावी.

टिप :

१. नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार प्रस्तावाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी विद्यापीठास सादर केलेल्या गुणांकनानुसार, छाननी समितीने दिलेला अभिप्राय व आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) आणि संबंधित अभ्यासक्रमामध्ये आवश्यक असणा-या शिक्षक पदांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत केलेल्या नियुक्त्या, शिक्षकेत्तर पदांच्या नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

२. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करुन घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पुढील सलग तीन वर्षामध्ये प्रपत्र 'अ', 'ब' किंवा 'क' मध्ये ६५% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२० अन्वये संलग्नीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेचा प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची/नैसर्गिक विस्ताराची मान्यता ही छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा. त्या अटीची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबंधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग, ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग, ६. पी.जी. प्रवेश.